T.E.S.S Late Vimalbai Uttamrao
Patil Arts and Late Dr B.S.Desale Science College, Sakri

T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule.

A

# FIELD(Project) SURVEY REPORT

# " Study on Kan River Ecosystem Project Sakri City Sakri Tahsil"

Presented by


पाटिल नतुबाई नरेंद्र

Department of Geography and Environmental Science


Year- March 2019-20

PRINCIPAL
TS.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr B.S Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule.

# Certificate

T.S.S's. Smt V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri,Tal.Sakri,Dist.Dhule

This is to certify that Mr./Miss पाटील ज्ञानबाई नरेंद्र

Examination Roll No.25---Visited " **Study on Kan River Ecosystem Project Sakri City Sakri Tahsil"** Tal- sakri Dist-Dhule, for the fulfillment of partial B.A. I, II and III Geography Practical Paper No II and IV Section II and Environmental Science Field Village Survey Primary data methods.

This work is carried out under my supervision.

Sub Teacher

Head/Coordinator
Department of ------------
TES'S V.U.Patil College Sakri

PRINCIPAL
TS.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule.

https://docs.google.com/document/d/15Mz7oChkG-7Vw6AG8nsPEXSBiKf0vuXqGAbNz0UhTYE/edit#heading=h.gjdgxs

T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

# ऋणनिर्देश

शैक्षणिक वर्ष 2019-2020 या वर्षासाठी भूगोल विभाग स्पेशल च्या व प्रथम वर्ष कला विज्ञान शाखेतील पर्यावरणशास्त्र या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी साक्री येथील कान नदीच्या परिसंस्थेचे सर्वेक्षण करून प्रकल्प अहवाल तयार करायला आम्हाला, या विषयाचे प्रमुख प्रा. अजय नांद्रे यांनी माहिती दिली आहे. या प्रकल्पासाठी साक्री- पिंपळनेर रस्त्याच्या दोन्ही बाजू कडील एक एक किलोमीटर परिसरातील कान नदीतील परिसंस्थेचा अभ्यास करण्याविषयी मार्गदर्शन केले आहे. हा प्रकल्प तयार करण्यासाठी एस. वाय. बी. ए व टी. वाय. बी. ए. वर्गातील भूगोल स्पे विद्यार्थ्यांसाठी वेगळे मुद्दे सर्वेक्षण करण्यासाठी दिलेले होते तर प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वेगळे मुद्दे दिले होते व प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वेगळे मुद्दे दिले होते आणि त्यानुसार क्षेत्र अभ्यासासाठी आवश्यक ती माहिती संकलन करून या नदीपात्राविषयी तेथील परिसंस्थेविषयी विविध मुद्द्यांच्या अनुषंगाने विश्लेषण करायला सांगितले होते.

प्रथम प्रकल्प अहवाल तयार करण्याविषयी आमच्या मनात खूप भीती होती मात्र प्रा. अजय नांद्रे यांनी वेगवेगळ्या मुद्द्यांच्या माध्यमातून माहिती संकलन करण्याविषयी मार्गदर्शन केले व मनातील भीती दूर झाली आणि मग त्या मुद्द्यांच्या माध्यमातून माहिती गोळा केल्यानंतर विश्लेषण करण्यासाठीही पूर्णपणे सरांनी मार्गदर्शन केले व शेवटी छान असा प्रकल्प तयार झाला खरं म्हणजे प्रकल्प तयार करणे म्हणजे खूप मोठी भीती सर्वच विद्यार्थ्यांच्या मनात होती मात्र सर्व माहिती संचित झाल्यानंतर विविध मुद्द्यांच्या माध्यमातून जे विश्लेषण केले गेले व त्यातून जो प्रकल्प तयार झाला आम्हा सर्व विद्यार्थ्यांना याचा खूप आनंद झाला. संशोधनातून कशाप्रकारे कार्य केले जाते याविषयी आम्हा सर्व विद्यार्थ्यांना खूप अनमोल प्राथमिक माहिती मिळाली व आमच्या मनातील भीती दूर झाली. आम्हाला मार्गदर्शन करणारे मा. प्राचार्य डॉ पी. एस. सोनवणे व प्रा. भटू पाटील, प्रा. अभिजित भामरे, प्रा. कैलास वाघ व समन्वयक प्रा अजय नांद्रे यांचे सर्व विद्यार्थी प्रथम आभार व्यक्त करतो व त्यांच्या ऋणात राहू इच्छितो.

धन्यवाद

आपला विद्यार्थी /विध्यार्थिनी

PRINCIPAL
T.S.S's.Smt. V.U.Patil Arts & Late Dr B.S. Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

https://docs.google.com/document/d/15Mz7oCbkG-7Vw6AG8nsPEXSBiKf0vuXqGAbNz0UbTYE/edit#heading=h.4ay6r7bt1xg1

१) क्षेत्र अभ्यासाची प्रस्तावना.

प्रकल्प अहवाल तयार करणे म्हणजे संशोधनाची पहिली पायरी असल्याचे लक्षात आले. एखादा विषय निवडून त्या विषयाची विविध प्रश्नांच्या माध्यमातून माहिती जाणून घेणे व ते एकत्रित करून विश्लेषण करणे अतिशय उत्तम अशी अभ्यासाची प्रक्रिया असल्याचे लक्षात येते. विद्यार्थी जीवनात वर्गात शिक्षण अतिशय चांगल्या माध्यमातून मिळत असते मात्र पर्यावरण शास्त्र व भूगोल विषयाचे मोठ्या प्रमाणात ज्ञान हे वर्गाच्या बाहेर असणाऱ्या शिक्षणामधून ही प्राप्त केले जाऊ शकते हे या प्रकल्प अभ्यासाच्या माध्यमातून लक्षात आले. कान नदी परिसंस्थेचे भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास करत असताना अनेक नाविन्यपूर्ण गोष्टी या क्षेत्रात लक्षात आल्या त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची व बौद्धिक पातळी वेगवेगळे असल्याने जेव्हा एकत्रित रित्या सीनियर व जुनिअर विद्यार्थी काम करत असतात त्यावेळेस काही नाविन्यपूर्ण मुद्दे उजेडात येत असतात आणि सरांनी खरं म्हणजे आम्हाला याविषयी माहिती दिली होती की आपणास लक्षात येत असलेली सुचत असलेली जी घटना आहे तिची नोंद करायची तिचे विश्लेषक होऊन विश्लेषण करायचे व त्यासाठी आपापसात गटचर्चा करायची याविषयी मार्गदर्शन केले होते.

आम्हाला दिलेला प्रकल्प साक्री शहरालगत वाहणारी पांझरा नदीची उपनदी कान या नदी परिसंस्थेचा अभ्यास करायचा होता. शहरापासून जवळच असणारी ही नदी साखळी शहराला पिण्याचा पाण्याचा पुरवठा आठ महिन्यांपर्यंत करत राहते साहजिकच काही कालावधी वाहता व काही कालावधी खंडित तर काही कालावधी कोरडा असा या नदीचा वार्षिक चक्र पाहायला मिळते. महाविद्यालयापासून एक किलोमीटर परिसरातील प्रकल्प अहवाल दिलेला असल्याने विद्यार्थी वेळेनुसार दिलेले जबाबदारी पूर्ण करून हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सर्वांनी मेहनत घेतली. या नदी परिसंस्थेचा नैसर्गिक दृष्टिकोनातून सभोवतालच्या वस्तीवरील प्रभाव सांस्कृतिक धार्मिक ऐतिहासिक घटकां वर या नदीचा होणारा प्रभाव इत्यादी विविध मुद्द्यांच्या अनुषंगाने हा प्रकल्प तयार केला आहे.

PRINCIPAL
TS.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule.

2) प्रकल्प अहवालाचा हेतू व उदेश

कोणतही प्रकल्प अहवाल सादर करत असताना काही विषय डोळ्या संमोर ठेवले तर प्रकल्प अहवाल संशोधानात्मक वृत्तीने तयार होतो म्हणून सरांच्या मार्ग दर्शनात पुढील हेतू व उदेश डोळ्या समोर ठेवले.

१) संशोधनान्त्मक वृत्ती निर्माण करणे.

२) विध्यार्थ्यामध्ये एकोपाची भावना जागृत करणे.

३) क्षेत्र अभ्यास प्रकल्प तयार करन्याविषयी प्रेरणा निर्माण करणे.

४) नदी परीसंस्थेच्या समस्या जाणून घेणे.

५) शहरातील अनुभवी लोकांचे मार्गदर्शन मिळवणे.

६) साक्रीचे अर्थकारण जाणून घेणे.

७) बारमाही नदी का खंडित झाली त्याविषयी माहिती मिळवणे.

८) जल संपदेचे महत्व लक्षात आणून देणे.

वरील इ हेतू व उदेश लक्षात घेऊन प्रकल्प अहवाल सादर करणार आहोत.

Late Dr.B.S. Desale Science College, Tal.Sakri, Dist.Dhule, T.S.S's

PRINCIPAL
TS.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr B.S. Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule.



ttps://docs.google.com/document/d/15MzZoChkG-7Vw6AG8nsPFXSBiKf0vuXgGAhNz0UhTYE/edit#heading=h.4ax6r7bt1xg1

T.S.S's. Smt. V.U.Patil Arts College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule • T.S.S's. Dr. B.S. Desale Science

3) साक्री गावाची पार्श्वभूमी -

साक्री हि शहरी वस्ती असून तालुक्यातील आर्थिक व राजकीय दृष्ट्या विशेष्टपूर्ण वस्ती आहे. साक्री तालुक्यातील माळमाथा परिसर, काटवन डोंगरी विभाग, व पांझरा व कान नदीचा मैदानी प्रदेश म्हणून या विभागाची ओळख आहे. साक्री हि वस्ती नगर पालिका म्हणून गेल्या ४ वर्षापासून निर्माण झाली. या शहरात २ कनिष्ट महाविद्यालय, २ वरिष्ठ महाविद्यालय, तर ४ महाविद्यालय, १ जिल्हा परिषद, ५ इंग्लिश विद्यालय आहेत. तालुक्यात सह्भोतालच्या गावातून येथे विद्यार्थी शिक्षण घ्यायला येतात. येथे पंचायत समितीचे मुख्य कार्यालय आहे, आरोग्य विभागाचे मुख्य केंद्र आहे, तहसील कार्यालयाचे मुख्य विभाग आहे, पोलीस विभगाचे कार्यालयाचे मुख्य विभाग आहे. कृषी कार्यालयाचे मुख्य विभाग आहे तसेच जलसिंनाचे तालुक्याचे कार्यालयाचे मुख्य विभाग आहे. याचबरोबर खाजगी डॉक्टर रुग्णालये सुसज्ज आहेत. लहान मोठे उद्योगाचे केंद्र आहेत. व्यापारी पेठ आहे. कृषी बाजार पेठ चे मुख्य केंद्र आहे. दुग्ध संकलनाचे केंद्र आहे. जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, इंजिनियर, उद्योगपती, आदर्श शेतकरी,इ वेगवेगळ्या वैशिस्थेसाठी साक्री हे शहर प्रसिद्ध आहे. या गावात सर्वच कामासाठी लोकसहकार्य व लोकसहभाग मिळत असल्याचे उदा. पाहायला मिळते. या शहरात शिक्षणाचे प्रमाण छान आहे कारण निवृत्त शिक्षकयांचे प्रमाण खूप आहे. त्याचा अनुकूल परिणाम वर्तमान पिढीतील तरुणावर झालेला दिसत आहे.एकुनच या शहराचा सर्वांगीण अभ्यास केल्यावर या शहराचा अभ्यास करताना खूप आनंद होत होता व खूप काही नवीन अभ्यास क्षेत्राविषयी कल्पना येत होती.

४) साक्री शहराची लोकसंख्या -

अ) लोकसंख्या - साक्री शहराची २२८०० एकूण लोकसंख्या २०११ च्या जणगनेनुसार आहे. यात १०३३२ महिला आहेत तर १२४६८ पुरुष आहे . ST Category ची लोकसंख्या 5253 आहे तर SC Category ची लोकसंख्या 2123 तर मुस्लीम समाजाची लोकसंख्या 3564 आहे. तर मराठा समाज ची लोकसंख्या8642 हि सर्वाधिक आहे.व बाकी इतर समजाची संख्या 1095 आहे. मराठा समाजाची लोकसंख्या सर्वाधिक असून सुद्धा या गावात आजपर्यंत जातीय तणाव झालेला नाही यावरून या गावाचा एकोपा आदर्श घेण्यसारखा आहे. या विषयी माहिती जाणून घेतली असता मराठा समाजाची लोकसंख्या सर्वाधिक शेती व नोकरी या व्यावासाशी निगडीत आहे. याशहराची वैशित्ये पूर्ण माहीती येथील वृद्धांनी दिली. या शहरात जि शेती केली जाते ति अतिशय एकमेकांच्या सहकार्याने व सहभागाने केली जाते व येथील कष्टकरी लोकांना जो मोबदला दिला जातो तो धान्याच्या स्वरुपात दिला जातो म्हणून सकस आहार सर्वच लोकांना मिळतो अन्नाविना कुणीही उपासी येथे राहत नाही कारण येथील सामाजिक रचना अतिशय छान असल्याचे पाहायला मिळते. या शहरात अनेक सामाजिक संस्था सामान्य लोकांसाठी मदत कार्य करत असल्याने सर्व प्रकारचे लोक गुण्या गोविंदाने जीवन जगात आहेत.

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist. Dhule.

T.S.S's. Smt. V.U.P. ... College Sakri ... T.S.S. Deale Science ... Sakri, Dist. Dhule

ब ) लिंगगुणोत्तर-

साक्री शहरातील येथील लिंग गुणोत्तर ९७५ आहे म्हणजेच देशाच्या लिंग गुणोत्तरापेक्षा येथील लिंग गुणोत्तराचे प्रमाण चांगले आहे त्यातच एसटी समाजातील लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता तेथे एक हजाराच्या जवळपास लिंग गुणोत्तर पाहायला मिळते याविषयी अधिक माहिती घेतली असता भिल्ल समाजामध्ये मुलीला महत्त्व असल्याकारणामुळे लिंग परीक्षण केले जात नाही तसेच मुलगा मुलींमध्ये भेदभाव केला जात नाही त्यामुळे या समाजात लिंग गुणोत्तराचे प्रमाण जास्त पाहायला मिळते.

५) साक्री शहराची प्राकृतिक रचना -

विशेता साक्री शहराची प्राकृतिक रचना एकाच प्रकारची आहे.

कान नदी जवळचा मैदानी प्रदेश

साक्री शहरा जवळून कान हि नदी वाहत असून. हि नदी हंगामी स्वरुपाची आहे . २५ ते ३० वर्षापूर्वी हि नदी बारमाही स्वरुपाची होती. कान नदीने शेकडो वर्षांपूर्वी तिच्या किनाऱ्याच्या दोन्ही बाजूला अतिशय वशिष्ठ पूर्ण रचना निर्माण केलेली आहे आणि यामुळेच कान नदीच्या च्या किनाऱ्यावर सुपीक संचेयित झालेल्या गाळाच्या विभाग पाह्यला मिळतो तशेच हा गाळ सभोवताली असलेल्या शेतात टाकला जात असल्या मुळे येथील शेती सुपीक करून टाकलेली दिसते या सुपीक पट्ट्यापर्यंत पाईपलाईनणे पाणी आणून हंगामी शेतीचे बारमाई शेतीत रूपांतर केले यालाच ग्रुप शेती गट पद्धत असे म्हणतात. या गट पद्धतीमध्ये सर्व गावातील सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्रित येऊन थोडी थोडी जमीन चा तुकडा शेती करायला दिली सामान्यपणे या प्रक्रियेला दोन ते तीन दशक वर्षांपूर्वीचा इतिहास असल्याचे मत व्यक्त केले जाते. गावातील ज्येष्ठ लोकांनी या पद्धतीचे अतिशय कौतुक केले नाविन्यपूर्ण पद्धत असल्याचे मत स्पष्ट केले त्याचबरोबर ही पद्धत नावीन्यपूर्ण असण्याच्या कारणासाठी पुरावे ही दिले ही पद्धत राज्यात प्रसिद्ध म्हणून ओळखले जाते. वीस तीस वर्षांपूर्वी ही शेती बारमाही स्वरूपाची होती येथे ऊस भात यासारख्या पिकांचे लागवड केली जात होते मात्र कालांतराने ही पद्धत हळूहळू दुर्लक्ष केली जात आहे त्यामुळे गाळयुक्त असल्याने येथील उत्पादन तालुक्यात प्रति एकरी च्या बाबतीत सर्वाधिक आहे.

या सर्व घटकांवरून या मैदानी प्रदेशाचा अभ्यास केला तर साक्री शहराची येथील सुपीक मैदानी प्रदेशाचा भाग अतिशय सुपीक सकल संपन्न व शाश्वत शेतीचे उत्पादन देणारा असा हा मैदानी पट्टा आहे साधारणतः २५० एकर क्षेत्राचा हा सुपीक पट्टा पाहायला मिळतो.

६) कान नदी

कान नदी या गावापासून सामान्यपणे २० मीटर अंतरापर्यंत नदी वाहत जाते. या नदीच्या डाव्या तीरावर साक्री हे शहर वसलेले असून सामान्यपणे धोकादायक पूर क्षेत्रामध्ये हे गाव काही प्रमाणात येते. मात्र पावसाळ्यात सतत चा पाऊस २ ते ३ दिवस असला तर येथील पुला वरून पाणी जात असल्याने

PRINCIPAL
T.S.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S. ... College
Sakri, ... Dhule.

s://docs.google.com/document/d/15MzZoChkG-7Vw6AG8nsPFXSBiKf0vuXqGAhNz0UhTYE/edit#heading=h.4ay6r7bl1xq1

साक्री- नाशिक हा प्रमुख मार्ग खंडित होतो. तसेच उत्तरेकडील गावांचा संपर्क तुटतो. मात्र या नदीमुळे साक्री या शहरचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला पाहायला मिळतो वर्षभर मुबलक पाणी व ठीक ठिकाणी पाण्याच्या वाटर बँक या नदीमुळे निर्माण झालेल्या आहेत म्हणून वर्षभर पाण्याचा तुटवडा कधीच निर्माण होत नाही त्याशिवाय शहर लगत या नदीवर बंधारा बांधलेला असल्याने मोठ्या प्रमाणात पाणी अडवले जाते त्यामुळे वर्षभर मासे, खेकड यासारख्या जलचर प्राण्यांचा अन्न म्हणून पुरवठा होतो त्यामुळे जनतेला सहज जाण्याचा पुरवठा होतो व काही लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगारही या माध्यमातून मिळत असतो. याविषयी सविस्तर माहिती घेतली असता मुस्लिम लोक तसेच भोई समाजाचे लोक मासेमारी हा व्यवसाय करतात तर आदिवासी भिल्ल लोक दिवसभर काम करून रात्रीच्या वेळी खेकड पकडण्याचे काम करत असतात त्यामुळे अन्नाची समस्या या माध्यमातूनही सुटत असते.

७) हवामान–

साक्री या शहराचा हवामानाचा अभ्यास केला असता येथील हवामान उष्ण ते थंड स्वरूपाचे पाहायला मिळते विशेषता या गावातील लोक हवामानाच्या बाबतीत समाधानी असल्याचे पाहायला मिळाले वर्षभर येथील सरासरी तापमान 30 ते 35 डिग्री च्या जवळपास आहे येथील उन्हाळा ऋतूत 45 डिग्री सेल्सिअस पर्यंत तापमान असते तर हिवाळा ऋतू 25 डिग्री सेल्सिअस पर्यंत तापमान पाहायला मिळते. पर्जन्याच्या बाबतीत माहिती जाणून घेतली असता सरासरी पाऊस पिकांच्या दृष्टिकोनातून समाधानकारक असतो मात्र चार ते पाच वर्षात एकदा कोरडा दुष्काळ असल्याचे या लोकांच्या चर्चेवरून लक्षात आले. जून ते सप्टेंबर या कालावधीत येथे पाऊस पडतो मात्र असे असले तरी शंभर दिवसांच्या जवळपास दिवस पाऊस पडतो व यातही ३५ तास पाऊस पडतो. उन्हाळ्यात धुळे, जळगाव, नंदुरबार येथील तापमानापेक्षा 3 ते ४ डिग्री सेल्सिअस तापमान कमी असते नदी किनार वरती या शहराचे स्थान असल्याने आद्रतेचे प्रमाण या गावात चांगले असते तसेच बागायती क्षेत्र जास्त असल्याने येथे काही प्रमाणात गारवा टिकून राहतो तर आद्रतेमुळे हिवाळ्यात तापमान खूप खाली येत नसल्याचे लक्षात आले अशा प्रकारचे वैशिष्ट्य हवामानाच्या बाबतीत पाहायला मिळते

8) मानवी व्यवसाय –

साक्री या शहराचा लोक सर्वप्रकारा च्या व्यवसायात गुंतलेले दिसून येतात नोकरी व शेती याशहराचा प्रमुख व्यवसाय असून शेती बरोबर नोकरीला असलेले लोकांचे प्रमाण हे खूप जास्त आहे राजकीय दृष्ट्या जिल्ह्याच्या राजकारणाच्या मध्यवर्ती स्थान या गावाचे आहे त्याचप्रमाणे सुतार, सोनार, न्हावी इत्यादी बारा बलुतेदार या ठिकाणी वास्तव्यास राहत असून अतिशय गुनगोविंदाने हे लोक व्यतीत करत असल्याचे लोकांच्या चर्चेतून पाहायला मिळाले. वर्षभर सर्व प्रकारचा रोजगार मुबलक असल्याने प्रत्येक परिवाराची आर्थिक स्थिती उत्तम आहे या कारणामुळे या शहराचा सर्वांगीण विचार केला असता आर्थिक संपन्न म्हणून या शहराचा तुलना केली तरी काही वावगे ठरणार नाही. या शहराच दरडोई उत्पन्न सभोवतालच्या गावांपेक्षा खूप जास्त आहे वर्षभर येथील धान्य बाजारपेठेमध्ये पाठवले जाते धान्याचे कोठारे म्हणून ही या शहरा

PRINCIPAL
T.S.S's Smt. ... Arts &
Late Dr. B... College
Sakri, ... Dhule.

पासून जवळच पवन उर्जा व सौर उर्जा केंद्र आहेत त्यामुळे विजेची समस्या पाहायला मिळत नाही. यामुळे लहान प्रमाणावरील उद्योग मोठ्या प्रमाणावर विकसित झाले आहेत त्यामुळे आर्थिक दृष्टिकोनातून व्यापार व्यवहार मोठ्या प्रमाणात होत असतात. या विभागात सर्वात जास्त पवन उर्जा निर्माण करण्याचे टावर व सौर उर्जा केंद्र आल्याने. या प्रदेशातील लोकांना रखवालगिरीची, इंजिनियर याना नोकरी मिळाली व त्या मुळे काही परिवार शेतात राह्यला गेले त्यामुळे शेतात वेळ सुद्धा देणे सोपे झाले व परिवाराला आर्थिक फायदा हि झाला. तालुक्यात एक छान पर्यटन केंद्र निर्माण झाले आहे.

9) प्राणी जीवन—-

नदी किनाऱ्यावरील स्थान या शहराचे असल्याने मुबलक पाणी सुपीक शेती व आर्थिक संपन्नता या कारणामुळे साधारणता ३००० ते ४००० प्राणी येथे पाहायला मिळतात. विशेषतः शहरा पासूनच जवळ शेती, या व्यवसायामध्ये बैलांचा वापर जास्त प्रमाणात केला जातो तर दुग्ध व्यवसायासाठी गाई व म्हशींचा वापर केला जातो. कारण हे शहर जवळच असल्याने अनेक तरुण दुग्ध व्यवसायामध्ये गुंतलेले पाहायला मिळतात. साधारणपणे धनगर समाजातील लोक शेळीपालन व मेंढी पालन करत असल्याचे दिसून येते त्याच्यापासून सुद्धा दुध उत्पादन घेतले जातात. कांदा, कापूस, मका यासारखे पिकांचे उत्पादन घेत असल्याने पशुंना चाऱ्याची उपलब्धता सहज होते त्याचबरोबर मका बाजरी ज्वारी यासारख्या पिकांचा चारा वर्षभर साठवणूक करतात त्यामुळे चारा टंचाई या परिसरात पाहायला मिळत नाही पावसाच्या कालावधीत येथील प्राणी चरायला जात असून 200 ते 250 एकर क्षेत्रावर साक्री शहरातील नगर पंचायत चे मोकळे शेत्र आहे याला तारेचे कुंपण करून दिलेले आहे त्यामुळे येथील शेतकरी पावसाळ्यात या क्षेत्रात कामाला जात असलेले प्राणी चारायला घेऊन जातात त्यामुळे येथील प्राणी जीवन संपन्न अशा स्वरूपाचे पाहायला मिळते प्राण्यांमुळे येथील लोकांना मोठ्या प्रमाणात अर्थ प्राप्ती ही करता येऊ लागली आहे.

१०) उद्योग

साक्री या शहर पासून पाच ते सह किलोमीटर अंतरावर साखर उद्योग प्रकल्प व मुख्य कार्यालय येथे होते. या गावापासून थोड्याच अंतरावर तेल काढण्याचा कारखाना आहे. जवळच असणारा साखर कारखाना हा वस्ती साठी वरदान होता मात्र २० वर्षापासून हा कारखाना बंद झाला व येथील मोठी आर्थिक प्रक्रिया बंद पडली. लहान गृह उद्योग खूप आहेत त्यामुळे आर्थिक चक्र वेगाने फिरते. या व्यतिरिक्त शेती हा मुख्य व्यवसाय असून नोकरी व्यावसायिक खूप आहेत.

११) वाहतूक व दळणवळण —

साक्री तालुक्याचे मध्यवर्ती स्थानाआहे. त्यामुळे या वस्ती पासून गाव सात ते आठ किलोमीटर अंतरावर पर्यंत वाहतूक व दळवळण यावर याचा खूप प्रभाव आहे. तसेच धुळे- सुरत या राष्ट्रीय महामार्गालगत हि वस्ती आहे तर साक्री ते नंदुरबार रस्त्यावर हि वस्ती आहे. या वस्ती पासून सर्वत्र पक्के रस्ते जातात त्यामुळे पावसाच्या कालावधीत शेतकऱ्यांचा भाजीपाला मोठ्या प्रमाणात सुरत येथे जातो तसेच नंदुरबार सटाणा नामपुर येथे कांदा विकला जातो, ५० किमी अंतरावर धुळे, नंदुरबार हे जिल्ह्याचे केंद्र आहेत तसेच मुंबई

PRINCIPAL
T.S.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri Dist.Dhule.

-आग्रा हा राष्ट्रीय मार्ग ५० किमी अंतरावर आहे. एकूणच वाहतुकीच्या सुविधेमुळे व्यापाराचा विकास झालेला पाहायला मिळतो व त्याचा परिणाम साक्री शहराचा विकासात पाहायला मिळतो.

१२) आकार-

साक्री या शहराचा आकार नालाकृती स्वरूपाचा आहे. साक्री वस्ती च्या सुरवाती पासून नदी ने यु आकाराला सुरवात केली व भाडणे या वस्ती च्या आधी १०० मीटरवर वक्रकर झाली व पुन्हा वळण घेतले त्यामुळे शहराच्या सुरवाती पासून आकार लक्षात घेतला तर नालाकृती आकार प्राप्त झाला आहे.

१३) पाण्याची बँक -

साक्री या शहराचा आकार नालाकृती स्वरूप लाभल्याने भूमिगत पाणी तीन बाजूने शहरात अंतर्गत जात असल्याने या शहराची पाण्याची पातळी खूप वर आहे. महणून या शहरात एकूण २००० -२२०० कुपनलिका आहेत व सर्व्यांना मुबलक पाणी आहे. पाण्याची मुबलक सुविधेमुळे या शहराचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे.

या पाण्याच्या बँकमुळे काही परिवार शेतात राह्यला गेले त्यामुळे शेतात वेळ सुद्धा देणे सोपे झाले व परिवाराला आर्थिक फायदा हि झाला. अनेक निवासी गृह व हॉटेल मुबलक पाण्यामुळे निर्माण झाल्या आहेत त्यामुळे यांचे अर्थकारण या कारणामुळे खूप वाढले आहे.

एकूणच या शहराचा सर्वांगीण विकास वरील विविध कारणामुळे झाला आहे मात्र साक्री या शहराला मध्यवर्ती स्थान विकासासाठी जीवनदायी ठरला आहे. पूर्वी रोजगारासाठी व शिक्षणासाठी दुसऱ्या शहरात येथील तरुणांना जावे लागत होते. मात्र अनेक सुविधा आता या शरत मिळत असल्याने बाहेरील अनेक विद्यार्थी येथे येऊ लागल्याने येथील तरुणाचे उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढले.

१३) कान नदी प्रदूषित होत आहे

साक्री शहराचा विकास जसा जसा होत आहे तश्या सुविधाही वाढायला लागल्या परिणामी विकासाचा या प्रकारामुळे काही समस्या कान नदीत पाह्यला मिळू लागल्या.

A ) अतिक्रमण -

कान नदी पुराच्या वेळी खूपच रौद्र रूप घेते कारण नदीच्या उगमावर खूप जास्त पाऊस पडतो त्यामुळे या नदीला पुराचे प्रमाण जास्त असते. मात्र गेल्या काही वर्षापासून काही ठराविक लोकांनी नदी किनार्यालगत असणाऱ्या पूर मैदानवर तेथिल जमीनिवर अतिक्रमण करून टाकले परिणामी नदी पत्रातच आता खाजगी सिमेंट च्या भिंती स्व स्वरक्षण करण्यासाठी केल्यात मात्र सभोवतालच्या दुसऱ्या भागावर पुराच्या पाण्याचा प्रभाव दिसून येऊ लागला. साक्री शहर जेथून सुरु होते तेथून नदी पात्राची रुंदी साधारनतः 150 मीटर पेक्षा जास्त होती. मात्र आता सर्वसाधारणपणे ५० मीटर पत्राची रुंदी पाहायला मिळू लागली. त्यामुळे भविष्यात ढग फुटीचा प्रकार जर निर्माण झाला तर मोठी आपत्ती ओढवली जाईल.

PRINCIPAL
TS.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Dist.Dhule.

tps://docs.google.com/document/d/15MzZoChkG-7Vw6AG8nsPFXSBiKf0vuXqGAbNz0UbTYE/edit#heading=h.4ex6r7bt1x...

B ) कचरा -

आज कान नदी परीसरात खूप मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात आहे. कारण नदी हंगामी असल्याने एप्रिल, मे आणि जून या ३ महिन्यात पुरेशा प्रमाणात पाणी राहत नाही म्हणून पत्र कोरडे दिसत असल्याने लग्नकार्यातील कचरा नदी पात्रात टाकला जातो. तसेच कोंबडी चे (चिकन) माउस व्यावसायिक वाया जाणारा कचरा कान नदी किनायावर टाकून जातात म्हणून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असल्याचे लक्षात येते. तसेच नगर पंचायत च्या माध्यमातून सुद्धा शहरातून एकत्र केलेला कचरा नदी पात्रात टाकला जातो म्हणून नदी परीसंस्थेला हा खूप मोटा धोका आहे.

C)'प्ल्यास्टिक कचरा -

पोलीथिन बॉग वापरण्यास परवानगी नसली तरी सर्रास पणे बाजारात या पिशव्या मध्येच सर्व वस्तू देतात परिणामी प्ल्यासस्टिक कचरा मोठ्या प्रमाणात शहरात निर्माण होतो परिणामी कालांतराने तो कचरा नदीपात्रात फेकतात तसेच विविध धार्मिक पूजा विधी केल्यानंतर फुले, पाने, कॅरी बँग निर्माल्य नदीच्या पाण्यात टाकण्याची प्रथा/ प्रवृत्ती असल्याने दररोज लोक येता-जाता पाण्यात टाकण्याची असताना आम्हाला पुलाजवळ जे पाणी बंधारा मुळे स्थिर झाले असल्याने मोठ्या प्रमाणात हा प्लास्टिक कचरा मोठ्या प्रमाणात साचलेला दिसत होता त्यामुळे कान नदीच्या या परीसंस्थाला धोकादायक आहे. कारण जानेवारी महिन्यात आम्ही सर्वे करत ही समस्या कान नदी दिसून आली.

D) स्वच्छता गृहाचा अभाव -

साक्री शहराची लोकसंख्या खूप जास्त आहे त्यातच काही व्यवसाय निमित्त बाहेरून स्थलांतर करून आलेले लोक मोठ्या प्रमाणात झोपड पट्टी मध्ये राहतात म्हणून या लोकांकडे खाजगी स्वच्छता गृहाचा अभाव आहे तसेच सार्वजनिक स्वच्छता गृहाच प्रमाणही कमी आहे. तसेच ग्रामीण मानसिकता या वेगवेगळ्या कारणामुळे नदी किनार्याच्या अवतीभोवती स्वच्छता भंग करणार्यांचे प्रमाण खूप जास्त आहे. हे सुद्धा कान नदी प्रदूषित करण्यासाठी मुख्य कारण आहे.

E) सांडपाणी -

साक्री या शहरात एकही सांडपाणी शुद्धीकरण केंद्र निर्माण केलेले नाही या परिसरात कान नदीला ८ नाले जोडले जातात व १० वेगवेगळ्या ठिकाणी कान नदी पात्रामध्ये गटारींचे सांडपाणी तसेच सोडले जाते. या कारणामुळे कान नदीच्या पाण्यात अतिशय प्रदूषित घटक पाहायला मिळतात. विशेष म्हणजे साक्री शहरात जे पाणी येते ते याच नदीचे. नदीच्या किनाऱ्या जवळ शहराला पाणीपुरवठा करणारी वहीर आहे आणि हि विहीर नदी ला लागून असल्याने हे घटक तसेच विहिरीत जातात. जेंव्हा लोकांनी पाण्याची चव अतिशय खराब असल्याच्या तक्रारी केल्या तेंव्हा जलशुद्धीकरण केंद्र बसवण्याचे जाहीर करण्यात आले व असे युनिट बसवून तात्काळ शहरात पाणीपुरवठा करणे सुरु झाले. मात्र १ ते २ वर्षात हे युनिट खराब झाले व पुन्हा आता पूर्वी सारखी परीस्थिती आहे. जलशुद्धीकरण केंद्रात पाणी टाकून शुद्धीकरण करून नागरिकांना पाणी सुविधा करून दिली तर आरोग्याची परिस्थिती ढासळनार नाही. हि फार मोठी

PRINCIPAL
TS.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

समस्या आहे. साक्रीत असंख्य कुपनलिका आहेत ज्या वेळी नदी खंडित होते त्या वेळी या कूप नलिका मधून सुद्धा दुषित पाणी येते. असे आम्ही सर्वे करत असताना येथील परिसरातील नागरिकांनी मत व्यक्त केले.

F) सण व उत्सव -

साक्री शहरात मोठ्या प्रमाणात सर्व जाती धर्माचे लोक राहतात म्हणून सण व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. उदा. गणेश उत्सव, नवरात्र उत्सव, भालदेव उत्सव, कानुबाई उत्सव, खंडेराव उत्सव इ. विविध उत्सव साजरे केले जातात मग ज्या वेळी विसर्जन केले जाते त्या वेळी मोठ्या प्रमाणत प्लास्टर ऑफ परीस ने तयार केलेल्या मुर्त्या नदी पात्रात सोडून दिल्या जातात. तसेच ९ ते १० दिवसात एकत्र झालेले निर्माल्या सुद्धा नदी पात्रात फेकून दिले जाते. परिणामी नदी दुषित होते म्हणून हि सुद्धा समस्या सोडवणे म्हत्वाचे आहे.

G) मृत प्राणी नदीत टाकणे.

साक्री शहरा लगतच धुळे-सुरत हा राज्य महामार्ग जात असल्याने सतत अवजड वाहने मोठ्या प्रमाणात या शहराच्या मध्य भागातून जात असल्याने गाढव, मोकाट, गायी, डुक्करे, शेळ्या,कुत्रे, मेंढ्या इ प्राण्याचे मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने.हे प्राणी मोकाट असल्याने रस्त्यवरच मृत बॉडी पडून राहायची मग कुणी तरी नगर पंचायतीत तक्रार दिल्या नंतर कर्मचारी यायचा व नदीत ओढत फेकून द्यायचा मग साहजिकच नदी परिसरात दुर्गंदी निर्माण होत होती किंवा पाणी दुषित होते. हा प्रश्न सुद्धा लक्षात घेण्या सारखा आहे.

H) कान नदी पात्रातील वाळू उपसा -

नदी मध्ये वाळू हा घटक तेथील परीसंस्थेला सुरक्षित ठेवण्यासाठी महत्वाचा घटक आहे. तसेच सभोवतालच्या भागातील पाण्याची भूमिगत पातळी उंचावण्यासाठी महत्वाचा भाग आहे. मात्र गेल्या काही वर्षापासून कान नदी पात्रात मोठ्या प्रमाणात वाळू उपसा चोरट्या मार्गाने रात्री -पहाटे काही लोकांकडून तस्करी केली जात असल्याने या नदी पात्रातील वाळू चे प्रमाण खूप कमी होत आहे. आज कान नदी हंगामी होण्यामागे हा फार महत्वाचा भाग/ समस्या कारणीभूत आहे.

PRINCIPAL
TS.S's.Smt. V.U.Patil Arts &
Late Dr B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule.